Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 13 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १३ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

१३ डिसेंबर २००१ रोजी संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा आज २३ वा स्मृतिदिन आहे. या हल्ल्यात प्राण गमावलेल्या सुरक्षा जवानांना आणि पीडितांना देशभरातून आदरांजली अर्पण केली जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या शूरवीरांना आदरांजली अर्पण केली. सामाजिक माध्यमावरच्या संदेशात त्यांनी, हुतात्मा जवानांचं धैर्य आणि निःस्वार्थ सेवा आपल्याला सतत प्रेरणा देत राहील, असं म्हटलं आहे. दहशतवादाचा मुकाबला करण्याच्या भारताच्या अढळ संकल्पाचा राष्ट्रपतींनी पुनरुच्चार केला.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री आणि खासदारांनी आज संसद भवनात हुतात्म्यांना पुष्पांजली अर्पण केली.

****

देशानं राज्यघटना स्वीकारली त्या घटनेला ७५ वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त लोकसभेत आजपासून दोन दिवस त्यावर विशेष चर्चा होणार आहे. प्रश्नोत्तराच्या तासानंतर या चर्चेला सुरुवात होईल. विविध पक्षांचे नेते दोन दिवस त्यावर सभागृहात आपले विचार मांडतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या यावरील चर्चेला उत्तर देणार आहेत. राज्यसभेत १६ आणि १७ तारखेला संविधानावर चर्चा होणार आहे. या विशेष चर्चेच्या अनुषंगानं काल पंतप्रधानांनी भाजपचे अध्यक्ष जे. पी नड्डा, अमित शहा यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसोबत धोरणात्मक बैठक घेतली.

****

देशाच्या किरकोळ किमतीवर आधारित चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात घसरुन ५ पूर्णांक ४८ शतांश टक्क्यावर आला आहे. ऑक्टोबर महिन्यात हा दर ६ पूर्णांक २ दशांश टक्के इतका होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी

मंत्रालयानं जारी केलेल्या आकडेवारीनुसार, शहरी भागात हा दर ४ पूर्णांक ८३ दशांश टक्के, तर ग्रामीण भागात तो ५ पूर्णांक ९५ दशांश टक्के इतका आहे.

****

जैश – ए – मोहम्मद या संघटनेच्या दहशतवादी कट प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्था – एनआयएनं काल आठ राज्यांत १९ ठिकाणी छापे घातले. या छाप्यांमधून बरीच आक्षेपार्ह कागदपत्रं, इलेक्ट्रॉनिक उपकरणं, पेन ड्राईव्ह, सीडी, हार्डडिस्क असं साहित्य हस्तगत करण्यात आलं.

****

देश परदेशातल्या गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणुकीकरता आकर्षित करण्यासाठी राज्य शासनामार्फत आता विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. देशातल्या तसंच परदेशी गुंतवणुकीसाठी गुंतवणूकदारांच्या प्रस्तावांवर त्यांना सल्ला आणि मदत देण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. नवीन गुंतवणुकीसाठी जागतिक आणि प्रादेशिक गुंतवणूक व्यापारासह सुसंगत धोरण तयार करण्यावर भर दिला जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं.

****

आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत महायुतीचा विजय होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. काल मुंबईतले शिवसेनेचे माजी नगरसेवक, विभागप्रमुख, पदाधिकारी आणि नेत्यांची बैठक शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत आगामी मुंबई महापालिका निवडणुकांबाबत चर्चा करण्यात आली.

****

रत्नागिरी जिल्ह्यातल्या जयगडमध्ये काल दुपारी झालेल्या वायुगळतीमुळे ५८ जणांना त्रास झाला असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सर्वांची प्रकृती स्थिर असून, त्यांना आज रुग्णालयातून घरी पाठवण्यात येईल, अशी माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली. जिंदाल कंपनीच्या जे एस डब्ल्यू बंदरात नियमित देखभाल–दुरुस्तीचं काम सुरू असताना इथिल मरकॅप्टन या वायूची थोड्या प्रमाणात गळती झाल्यामुळे परिसरातल्या नागरीकांना त्रास झाला.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण आणि हत्या प्रकरणातल्या आरोपींना तत्काळ अटक करावी, या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करावी अशी मागणी लातूर इथल्या सकल मराठा समाजाच्या वतीने

करण्यात आली आहे. या मागणीचं निवेदन काल लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलं.

****

परभणी जिल्ह्यात शांतता, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली काल शांतता समितीची बैठक पार पडली. जिल्ह्यात झालेल्या हिंसाचारानंतर नुकसानीचा पंचनामा करण्यास सुरुवात झाली असून, नुकसानग्रस्तांना भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल, तसंच दोषीवर कारवाई केली जाईल, असं गावडे यांनी सांगितलं.

नांदेड इथं झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत जिल्ह्यात शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केलं.

****

'एक देश एक विद्यार्थी ओळख' या संकल्पनेतून राबवण्यात येणाऱ्या 'अपार' नोंदणीत सिंधुदुर्ग जिल्ह्यानं राज्यात पहिला क्रमांक राखला आहे. अहिल्यानगर जिल्हा दुसऱ्या स्थानावर तर रत्नागिरी जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात आठ लाख १९ हजार ९५ विद्यार्थ्यांची म्हणजेच ९० टक्क्यांहून अधिक 'अपार' नोंदणी पूर्ण झाली आहे.

****

ओमानमधल्या मस्कत इथं सुरु असलेल्या महिला कनिष्ठ हॉकी आशिया चषक स्पर्धेत चौथ्या पूल ए सामन्यात भारतानं काल थायलंडचा नऊ - शून्य असा पराभव केला. या विजयासह, भारताने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

****